# प्रकरण चौथे

# 'अश्वदा' कादंबरीतून प्रकट होणारे जीवन दर्शन

# प्रकरण चौथे

## 'अश्वदा' या कादंबरीतून प्रकट होणारे जीवनदर्शन

### अ) 'अश्वदा' मधील स्त्री-मनाची व्यथा वेदना

वर्तमान काळ हा 'स्त्री मुक्ती' चर्चेचा वैचारिक जागृतीचा व स्त्रीच्या आत्मशोधासाठी चाललेल्या चळवळीचा कालखंड आहे. सर्व जगात 'स्त्रीवाद' नावाचे नवे तत्वज्ञान उदयास आले असून त्यानुसार स्त्रियांचे प्रश्न व स्त्रियांचे वाङ्मय अभ्यासले जात आहे. बरेच लेखक हे स्त्रियांच्या प्रश्नावर आधारीत कादंबऱ्या लिहीत असलेले आपणास पहावयास मिळतात. आज स्त्रिया पुरूषांच्या बरोबरीने काम करताना आपण बघत आहोत. परंतु तरीही पुरूषांइतका समान दर्जा स्त्रीला दिला जात नाही. पूर्वीपासून स्त्रीला समाजात दुय्यम स्थान असलेले दिसून येते. A female is femal by virtue of certain lack of qualities. अशा शब्दात ॲरिस्टॉटलने स्त्री ही उणी आहे, दुय्यम आहे. अशी कल्पना मांडली आहे. स्त्रीला असतेपण प्राप्त होते ते कुणा दुसऱ्याच्या संदर्भात ती कुणाची तरी कन्या असते, भगिनी असते, प्रिया असते, पत्नी असते. परंतु तिची म्हणून केवळ 'ती' निखळ 'स्त्री' असत नाही. तिचे संगोपनही एक 'मुलगी' ''[१] म्हणून होते. तिचे जगणे, तिच्या इच्छा, आशा, आकांक्षा तिच्या वाट्याला येणाऱ्या पतीच्या इच्छेवर अवलंबून असतात. तिला होणारे मूल पित्याचे नाव लावते. पण अपत्य संगोपनाची जबाबदारी मात्र केवळ स्त्रीची राहते. मात्र ययातीकन्या माधवीच्या वाट्याला तेही सुख येत नाही. स्त्रियांच्या समस्या या महाभारतकालापासून ते आजच्या कलियुगापर्यंत समान असलेल्या दिसून येतात. महाभारतकालीन स्त्रियांना अनेक वर प्राप्त झाले होते. त्या स्त्रियांना आपण देवासमान मानतो. तत्कालीन स्त्रियांची परिस्थिती ही फार बिकट असलेली दिसून येते. स्त्रियांना कोणतेही स्वातंत्र्य असलेले दिसून येत नाही. महाभारतातील स्त्रियांच्याविषयी शं.वा.दांडेकर लिहितात, ''राज्यकर्त्या स्त्रीची कल्पना मात्र आर्य समाजाला

कधीच स्वागतार्ह वाटली नाही. राजघराण्यात जन्माला आलेल्या गांधारी, द्रौपदी, कुंती वगैरे स्त्रियांच्या विचारांची छाप त्यांच्या पतीवर व पुत्रांवर बरीच पडलेली दिसते. पण महाकाव्यांच्या व पुराणांच्या काळात एकाही स्त्रीने राज्य केल्याचा उल्लेख नाही. कुरूक्षेत्रावरील घोर संग्रामानंतर भीष्माने युधिष्ठिरास अशी सूचना केली की, ज्या राजांनी रणांगणावर देह ठेवले त्यांना मुलगे नसल्यास मुलींना सिंहासनावर बसवावे, परंतु एखाद्या मुलीने खरोखर राज्य केल्याचा पुरावा देता येणार नाही. जात्याच नाजूक व मनाने कमकुवत असल्यामुळे स्त्रिया प्रशासक होऊशकणार नाहीत अशी त्यावेळी लोकांची कल्पना असे.''[२]

महाभारतात अनेक स्त्रिया होऊन गेल्या त्यापैकी एक म्हणजे ययातीकन्या माधवी होय. संध्या देशपांडे यांनी आपल्या 'अश्वदा' या कादंबरीत माधवीच्या जीवनात ज्या घटना घडल्या त्याचे चित्रण केले आहे. माधवीबरोबर या कादंबरीत देवयानी, शर्मिष्ठा, रंभा, बिंदुमती, सत्यवती, दृषव्दती, चित्रलेखा, विधी अशा बऱ्याच स्त्रियांचा उल्लेख आपल्याला आढळतो. या सर्व स्त्रियांच्या व्यथा-वेदना या कादंबरीच्या माध्यमातून मांडून त्यांना योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न लेखिकेने केलेला दिसून येतो. या कादंबरीत माधवीच्या जीवनात जे सनातन असे दु:ख आले ते चित्रित केले आहे. स्त्री ही राजकन्या असो वा सामान्य स्त्री असो स्त्री ही स्त्रीच असते. सर्व स्त्रियांचे दु:ख हे समान असते. राजकन्या असली तरी तिला दु:ख भोगावेच लागते. तिची शारीरिक व मानसिक तडफड कशी होते आणि तिच्या या साऱ्या तडफडीला जबाबदार पुरूष असतो. तो आपला स्वार्थ साधीत कसा अलिप्त राहतो याचे चित्रण कादंबरीत केले आहे.

**माधवी :-**

या कादंबरीची नायिका ही प्रतिष्ठानचा प्रसिद्ध सम्राट ययाती याची अतिशय लाडात वाढलेली कन्या माधवी आहे. माधवी दिसायला अतिशय सुंदर होती. स्वर्गातील देवांनाही जिचा मोह व्हावा असे तिचे रूप होते. श्वेतवस्त्र परिधान करून हिरण्यगर्भाला

अर्घ्य देण्यासाठी चालली असताना ती एखाद्या अश्वमेधी अश्वासारखी भासे. डौलदार, शुभ्रवर्णी, श्यामकुंतली अशी ती वाटे. श्यामल केस कानावरून गेल्यावर कर्णही श्यामल झालेले, कपाळावर कुंकुमतिलक, अंगावर एकही अलंकार नसताना देखील ती अतिशय सुंदर भासे. रूपाने, धनाने श्रीमंत असणारी ही राजकन्या होती. तरीही तिच्या जीवनात फार मोठे दु:ख तिला भोगावे लागले.

'आठशे अश्वमेधी अश्वांची' मागणी करणारा एक याचक गालव ययाती महाराजांकडे येतो. याचकाला देण्यासाठी 'आठशे अश्वमेधी अश्व' त्यांच्याकडे नसतात. याचकाला रिक्त हस्ताने कसे पाठवावे म्हणून आपली कन्या माधवी हिला दानात अर्पण करतात. एखाद्या सम्राटाशी माधवीचा विवाह करून आठशे अश्व मिळवावेत असे याचकाला सांगतात. परपुरूषाबरोबर आपल्या मुलीला पाठवत असताना माधवीची प्रतिक्रिया देखील जाणून घेत नाहीत. या वयात पित्याने मुलीला तिच्या प्रिय व्यक्तीबरोबर तिच्या हक्काच्या घरी पाठवायचे असते. ययाती महाराज तर आपल्या कन्येचे पित्याचे आश्रयस्थानही हिरावून घेतात. त्यावेळी माधवीच्या दु:खाला सीमा राहत नाही. आभाळ कोसळल्या सारखी तिची अवस्था होते. मात्र माधवी या जीवघेण्या संघर्षाला न डगमगता सामोरी जाते. आपले प्राक्तन समजून ती पित्याच्या निर्णयाला संमती देते. माधवी आपल्या ज्येष्ठ बंधू पुरूला म्हणते, ''तातांनी जर ठरवलेच असेल आणि गालवानेही मान्य केले असेल तर... तेच माझे भाग्य असले पाहिजे.''[३]

माधवीचा दान समारंभ झाल्यानंतर ती महाराजांनी तिच्याबरोबर दिलेल्या सर्व वस्तू नाकारते व विदुषकाला सांगते, ''महाराजांना म्हणावे, काशी-विश्वेश्वराला आणि पंचमहाभूतांना साक्षी ठेवून ही माधवी आपल्याला अभिवचन देते आहे की पितृकुलाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी आपल्या शरीराच्या अणुरेणूचे दान द्यायलाही ती तयार आहे.''[४] यावरून माधवी आपल्या पित्यासाठी किती त्याग करते हे दिसून येते. महाराज तिच्या

भेटीला येतात मात्र ती त्यांच्याशी काहीच बोलत नाही. महाराज गेल्यानंतर गालव पर्णकुटीचा दरवाजा बंद करतो आणि तो अशोकाच्या पारावर जाऊन बसतो. त्यावेळी माधवीला प्रथमच आपल्या मानसिक श्रमांची जाणीव झाली होती. तिने आपल्या विचारांना अश्रूंची वाट करून दिली होती. अश्रूंमधून ती आपल्या वेदनांना वाट करून देत होती. दुसऱ्या दिवशीचा दुपारचा मुहूर्त प्रस्थानासाठी ठरवला होता. दुसऱ्या दिवशी दुपारी माधवी गालवाबरोबर प्रतिष्ठानातून प्रस्थान करते.

'आठशे अश्वमेधी अश्व' देणारा एकही राजा गालवाला भेटत नाही. त्यामुळे दोनशे अश्वांच्या बदल्यात माधवीला पुत्र होईपर्यंत तीन राजांकडे ठेवतो. व सहाशे अश्व मिळवतो. पुत्र प्राप्ती होईपर्यंत असे तीन राजांकडे राहत असताना माधवीच्या मनाला किती असह्य वेदना होत असतील हे आपण जाणू शकतो. मात्र आपले प्राक्तन समजून ती त्याचा स्वीकार करत पुढे जात असते. आपल्या पुत्रांना असे ठेवून जाताना तिचे आतडे तुटत असते. तिला होणारे पुत्र हा तिच्या ओटीपोटात न वाढता गर्भागारात वाढत असतो. ब्रह्मर्षी आपल्या प्रयोगासाठी तिचा वापर करतात. गर्भागारातून ब्रह्मर्षी पुत्र बाहेर काढतात व माधवीकडे देतात. त्याचा लोभसवाणा स्पर्श माधवीला खूप आवडतो. त्या बाळाच्या आवाजाने तिच्या छातीत कालवाकालव होते. तिचे डोळे भरून येतात, मन दाटून येते. पण तिची छाती कोरडीच राहिलेली असते. अजाणतेपणीही माणसाच्या मनात किती जाणिवा असतात ते आपल्या लक्षात येते. माधवीने बाळाला छातीशी धरल्यावर त्या जीवालाही भूक अनावर झाली असावी. त्या बाळाने तिच्या स्तनांना आपले ओठ टेकविले आणि आपल्या या वांझ मातृत्वाने माधवीला असह्य वेदना झाल्या. ती मोठ्यांदा आक्रोश करते. ती ब्रह्मर्षींना म्हणते, ''तुम्ही मला फसवलेत. मी माता झाली नाही, मी आई झाले असते तर मला पान्हा फुटला असता त्याने हा तान्हुला सुखावला असता. त्याने माझे मातृत्व संपन्न झाले असते. हे कसले वांझोटे मातृत्व.''[५]

हर्यश्व, दिवोदास व उशीनर महाराजांकडे माधवी आपले पुत्र सोपवते. तरीही तिची पुत्रांशी नाळ तुटत नव्हती. मनाची घालमेल थांबत नव्हती. जिवाचा एकेक तुकडा जसा कापून काढला आहे आणि ठेवून दिला आहे एकेका कोनात असे तिला वाटत असते. माधवीला कोणावर तरी सूड उगवावा, आसूड ओढावेत असे वाटत होते. समोर कोणी नसेल तर माणूस स्वत:वरच सूड उगवतो. स्वत:चाच तिरस्कार करू लागतो तशीच माधवीची अवस्था झाली होती. ती गालवाला म्हणते, ''माझा वर्तमान मी जगले. माझ्या भविष्याची मला फिकीर वाटत नाही. पण माझ्या मुलांचे सारे आयुष्य जायचे आहे. त्यांच्या भविष्याची मला फार काळजी वाटते. मुनिवर, माझीच पोरे हातात शस्त्रे घेऊन एकमेकांवर तुटून पडत असल्याची भयानक स्वप्ने मला पडतात. आजुबाजूला रक्ताचा चिखल झालेला असतो. त्यातून एकेक आकृत्या वर येतात आणि माझ्याभोवती फेर धरतात. माझी ही मुले मला ओळखत नाहीत. मला पाहून वसुमना दृशेकडे धावतो, प्रत्यर्दन विधीकडे जातो आणि शिबी उशीनर महाराजांकडे धाव घेतो. माझ्याविषयीची त्यांच्या डोळ्यांतली ती अनोळख मला अधिक त्रस्त करते. मी त्यांना ओरडून सांगते, मी तुमची आई आहे आणि दृशा, विधी मोठमोठ्याने हसत राहिल्याचा मला भास होतो.''[६] माधवीच्या जीवाची घालमेल या संवादातून दिसून येते. मातृत्वानंतर कौमार्याची फार मोठी किंमत तिला मोजावी लागली होती.

गालव माधवीला घेऊन विश्वामित्रांच्या आश्रमात जातो त्या रात्री सारा आश्रम निद्राधीन झाला होता. माधवीला मात्र झोप येत नाही. स्वत:चीच असंख्य प्रतिबिंबे माधवीला तिच्याशी बोलत आहे असे वाटते. त्यातील पांढऱ्याशुभ्र केसांची म्हातारी तिला म्हणते, ''तुझा लिलाव तूच मांडला आहेस माधवी आणि थांबविणेही तुझ्याच हातात आहे. तुझी नशा तुला भोवली आहे. त्यागाची नशा. दानाची नशा. गालवासाठी आपण हे केले, हा तुझा अहंकार आहे. तूच वाचवू शकली असतीस स्वत:ला.''[७] दुसरे प्रतिबिंब तिला म्हणते,

''स्वतःची कसली कीव करतेस? कीव तुझ्या पुत्रांची करावीशी वाटते मला. जन्मतःच पोरके करून आलीस पोरांना. त्यांच्या वर्तमानाचा विचार केलास?''[८] तिची प्रतिबिंबेही तिच्या विरूध्दच बोलत होती. या सर्व बोलण्याने माधवी फार अस्वस्थ होते. तिला ययातीमहाराज व बिंदुमतीची आठवण होते.

विश्वामित्रांकडे ती पुत्राची मागणी करते. त्यावेळी विश्वामित्र तिला नकार देतात. त्यावेळी ती त्यांना म्हणते, ''विचार तुम्ही करा स्वामी. माझे विचार आता संपले. मला गालवाने तुमच्या स्वाधीन केले तेव्हाच ते संपले आणि माझ्या चौथ्या पुत्रजन्मानंतर मीही संपून जाईन. स्त्री म्हणून, आई म्हणून मी शिल्लक उरणार नाही. इथून बाहेर पडल्यावर माझे काय होईल याची मला फिकीर नाही.''[९] स्त्रीला आपल्या जीवनात अनेक नात्यांनी जोडले जाते. मात्र स्त्रीला माता होणे सर्वात आनंदायक वाटते. माधवीलाही आपण पूर्णतः आई व्हावे असे वाटते. कारण आई झाल्यानंतर स्त्रीला पूर्णत्व प्राप्त होते. विश्वामित्र तिची इच्छा पूर्ण करतात व तिला 'अष्टक' नामक पुत्र विश्वामित्रांपासून होतो. परंतु अष्टक ही तिच्यापासून दूरच केला जातो. चार पुत्रांना जन्म देऊनसुध्दा मातृत्वाचा आनंद तिला मिळत नाही. माधवीची ही व्यथा आपल्या मनाला पोखरत राहते. तिची ही विटंबना मनाला चटका देते. माधवीची अगतिकता तिचे नैराश्य तिचे दुःख, तिच्या व्यथा-वेदना यांना अंत नाही. तिचे भोग ती कसे भोगू शकली एवढे मोठे आघात ती कशी सहन करू शकली या विचाराने हृदय कळवळते. माधवी एक स्त्री असून चार पुरूषांना पुत्र देऊन परत अलिप्त राहणे हे केवढे मोठे दुःख. ते सोसण्याचे माधवीचे धैर्य पाहून हृदय आक्रंदत राहते हे कसले प्राक्तन ?

**चित्रलेखा-**

'चित्रलेखा' ही ययातीमहाराज व शर्मिष्ठा यांचा पुत्र पुरू याची पत्नी होय. पुरूचा व चित्रलेखेचा विवाह झालेल्याला काही महिनेच झाले होते. त्याचवेळी ययाती

महाराजांच्या जीवनात अश्रूबिंदूमती नावाची अप्सरा आली होती. ययाती महाराजांना तिचा फार मोह झाला होता. अश्रूबिंदूमती ययाती महाराजांना आपल्या पुत्राचे तारूण्य आणण्यास सांगते. तिच्या सांगण्यावरून स्वत:च्या स्वार्थासाठी, स्वत:ची शारीरिक भूक भागविण्यासाठी ययातीमहाराज पुरूचे तारूण्य मागून त्याला आपले वार्धक्य प्रदान करतात. चित्रलेखेला या गोष्टीमुळे खूप दु:ख होते. चित्रलेखा पुरूची पत्नी असूनही तिला न विचारता पुरू आपले तारूण्य पित्यास देऊन टाकतो. चित्रलेखेची तडफड जीवघेणी आहे.

चित्रलेखेला आपला प्रियतम हरवल्याची जाणीव होते. रात्री उशिरापर्यंत पुरू प्रासादाबाहेर राहत होता व पहाटे-पहाटेच निघून जात होता. ती पुरूशी या विषयावर बोलण्याचा प्रयत्न करत होती. मात्र त्यांच्यात संवादच होत नाही. त्यामुळे ती फार आकांत करते. लाज-लज्जा सोडून ती त्याच्यासमोर आव्हान बनून उभी राहते. मात्र पुरू शेणामेणाचा असल्यासारखा मातीच्या गोळ्यासारखा निराकार झाला होता. तिला त्याची विलक्षण किळस येऊ लागली होती. चित्रलेखा शर्मिष्ठेपाशी याविषयी खूप चर्चा, विनंती करत होती. मात्र तिच्या अगतिकतेपुढे शर्मिष्ठा देखील काहीच करू शकली नाही. शेवटी चित्रलेखा आत्महत्या करते. चित्रलेखेच्या वेदनेला अंत नाही. तिची आतल्या आत होणारी घुसमट, तिचे उमलते तारूण्य अस्पर्श राहते म्हणून तिचा होणारा कोंडमारा यातून तिने केलेली आत्महत्या वाचकाचे अंतकरण हेलावून टाकते. चित्रलेखेबद्दल आपल्या मनात कणव निर्माण होते.

**शीलवती -**

शीलवती ही विश्वामित्रांची पत्नी होय. विश्वामित्र कान्यकुब्जचे सम्राट होते. शीलवती ही सम्राटाची सम्राज्ञी होती. मात्र विश्वामित्रांना राजर्षी पद सोडून ब्रह्मर्षी व्हायची तीव्र इच्छा निर्माण होते. त्यासाठी ते कान्यकुब्ज सोडून तपश्चर्येला निघून जातात. त्यावेळी शीलवती माता एकटीच सर्व राज्यकारभार सांभाळते. विश्वामित्र तपश्चर्या करून

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

कान्यकुब्जेला परत येतात. त्यावेळी शीलवती भक्तीभावामे त्यांचा आदरसत्कार करते. विश्वामित्र राज्याचा त्याग करून आश्रमात रहायला जातात. त्यावेळी वैभवाचा हव्यास न करता ती विश्वामित्रांबरोबर आश्रमात रहायला जाते. आश्रमातील सर्व शिष्यांवर ती आपल्या पुत्राप्रमाणे प्रेम करते. विश्वामित्रांचीही ती नीट व्यवस्था पाहत असे. विश्वामित्रांच्या जीवनात अनेक स्त्रिया येतात. त्यातील रंभा ही विश्वामित्रांना भेटण्यासाठी नेहमी आश्रमात येत असे. रंभेच्या आगमनाने शीतवतीमातेला फार दुःख होत असते. त्याचबरोबर विश्वामित्रांमुळे माधवीची परवड होत असते. एक स्त्री म्हणून तिला हे पसंत पडत नाही. ती विश्वामित्रांना म्हणते, ''गालवाने आठशे अश्व असे आणून दिले तर चालतील तुम्हांला? कसला विजय महाराज? एका स्त्रीचा बाजार भरवून तुम्ही स्वतःचे ब्रह्मत्व सिद्‌ध करणार आणि तुमचा तो पुत्र त्यासाठी तुम्हांला मदत करणार, काय फरक आहे तुमच्यात आणि वसिष्ठांच्यात राजसत्तेपेक्षा ब्रह्मसत्ता श्रेष्ठ असे सिद्‌ध करण्याच्या नेहमी प्रयत्नात असतात ना वसिष्ठ? त्यांच्याबरोबर शह देता देता तुम्हीही त्यांच्या सारखेच झालात की काय? तुम्हालाही कुठेतरी ब्रह्मसत्ता श्रेष्ठ वाटू लागली आहे का? नहुषाची कन्या एका ब्रह्मवेत्त्यासाठी आपला वर पणाला लावते याचा अहंकार वाटतो आहे तुम्हाला? की चार राज्यांचे चार नरेश ब्रह्मर्षीसाठी दोनदोनशे अश्वमेधी अश्व देतील याचा आनंद होतो आहे? तुमच्याकडून माझी ही अपेक्षा नव्हती महाराज. तुम्ही माझा भ्रमनिरास केला आहे. मी इथे एक क्षणभरही थांबणार नाही.''[१०]

माधवीची होणारी ही फरफट शीलवतीला मान्य नव्हती. मात्र तिच्या मनाची व्यथा विश्वामित्र जाणत नाहीत. शीलवती आश्रम सोडून कान्यकुब्जला जाते. यामध्ये शीलवतीचा स्वाभिमानी स्वभाव दिसून येतो. पतीचे वागणे तिला आवडत नाही. म्हणूनच ती हा निर्णय घेते. तेव्हा त्याकाळी घेतलेला हा निर्णय म्हणजे शीलवतीचे फार मोठे साहस होय. हे धैर्य दाखविण्याचे बळ तिच्यात होते. त्यामुळे ती विश्वामित्रांना सोडून जाते. हा

तिचा निर्णय म्हणजे तत्कालीन समाजातील स्त्रीवर्गासाठी एक वस्तूपाठच होता असे म्हणावे लागेल. शीलवतीप्रमाणे जर स्त्रिया वागल्या असत्या तर त्यांचे नवरे बेताल वर्तन करू शकले नसते.

**शर्मिष्ठा -**

शर्मिष्ठा ही वृषपर्वा राजाची मुलगी होय. ती एक राजकन्या असून देखील तिला शुक्राचार्यांची मुलगी देवयानी ही ऋषिकन्या असून देखील तिची दासी व्हावे लागते. देवयानीचा विवाह ययाती महाराजांशी होतो. त्यावेळी शर्मिष्ठा तिची दासी म्हणून तिच्याबरोबर जाते. ही शर्मिष्ठेच्या बाबतीत घडणारी फार मोठी शोकांतिका आहे. ययाती महाराजांना शर्मिष्ठा आवडत असल्यामुळे त्यांनी तिच्याशी गांधर्व विवाह केला होता. ययाती महाराजांपासून तिला पुरू हा पुत्र होतो. मात्र हे सर्व देवयानीला मान्य नव्हते. त्यासाठी काहीदिवस शर्मिष्ठा पुरूला घेऊन राजवाड्यातून पलायन करते.

शर्मिष्ठेचा पुत्र पुरू याचे तारूण्य ययाती महाराज हिरावून घेतात. त्यावेळी आपल्या पुत्राची अवस्था पाहून तिला खूप दु:ख होते. तिची ही व्यथा महाराजांपुढे ती मांडू शकत नव्हती. तिची सून चित्रलेखा तिच्याकडे आपल्या पतीसाठी खूप विनवण्या करते. मात्र तिचा नाईलाज होतो. चित्रलेखेच्या आत्महत्येने पुरू खचतो. या सर्व गोष्टींचे तिला फार दु:ख होत असते. एका आईची अगतिकता येथे मनाला चटका लागते.

**रंभा -**

रंभा ही विश्वामित्रांच्या जीवनात आलेली अप्सरा होय. स्वर्गातील देवसुद्धा जिच्यासाठी जीव ओवाळून टाकतात अशी ही रंभा. मात्र हिचा जीव विश्वामित्रात गुंतला होता. विश्वामित्रांसाठी ती वसिष्ठांकडून त्यांची ग्रंथसंपदा आणून देते. मात्र विश्वामित्र तिची जराही कदर करत नाहीत. विश्वामित्रांशिवाय जीवन ही कल्पनाच तिला योग्य वाटत नव्हती. ती विश्वामित्रांना म्हणते, ''तुमच्याखेरीज आयुष्य म्हणजे मृत्यू. तुमच्याशिवाय

जगणं म्हणजे सत्वशून्यत्व. तुमच्याव्यतिरिक्त जग म्हणजे शून्य.''[११] यावरून ती विश्वामित्रांवर किती अतोनात प्रेम करत होती हे लक्षात येते. रंभेच्या या अवस्थेला विश्वामित्र कारणीभूत असतात म्हणून ते तिला आधार देतात. आश्रमाबाहेर तिला पर्णकुटी बांधून देतात मात्र तिला आश्रमात येण्यास बंदी करतात. त्यावेळी तिला खूप दु:ख होते. तिला फक्त विश्वामित्रांकडून एक पुत्र हवा असतो. मात्र विश्वामित्र तिची मागणी पूर्ण करत नाहीत. रंभेची पर्णकुटी पावसाने मोडते. त्यामुळे रंभा आश्रमात येते. त्यावेळी विश्वामित्र तिला म्हणतात, ''आत्म्याला झोपडीचे बंधन कशाला रंभा? तू मुक्त आहेस. कुठेही जाऊ शकतेस तू!''[१२] त्यावेळी रंभा म्हणते, ''आत्म्याला सजवणारी रंभा आता उरली नाही पण विश्वरथ मात्र अजूनही तोच आहे, गरती होण्याचा हट्ट मी सोडला तरी विश्वामित्र होण्याचा हट्ट सोडायला विश्वरथ तयार नाही.''[१३]

विश्वामित्रांना रंभेची पर्वा नसते. त्यामुळे रंभा त्यांच्या आयुष्यातून निघून जाते. रंभा अप्सरा असूनदेखील तिच्या नशीबी दु:ख येतेच विश्वामित्र आपल्या स्वार्थासाठी रंभेचा उपयोग करून घेतात त्यामुळे रंभा निराश होते. आजही आपल्या समाजात अशा अनेक 'रंभा' दिसून येतात.

**बिंदुमती :-**

ययाती महाराजांची अतिशय जवळची व विश्वासू सेविका बिंदुमती होती. ती माधवीची दूधमाय होती. तिने माधवीला जन्म दिला नव्हता मात्र तिचा सांभाळ तिने आपल्या पोटच्या मुलीसारखा केला होता. माधवीवर तिचा फार जीव होता. माधवीलाही बिंदुमतीशिवाय करमत नसे. महाराजांना काही सांगायचे असेल तर माधवी बिंदुमतीला सांगायला लावत असे. बिंदुमती महाराजांना सांगून माधवीचा हट्ट पुरा करत असे. बिंदुमती ही महाराजांची दासी नव्हती; तर ती एक बुध्दिमान व्यवहारकुशल स्त्री होती. ययाती महाराज आपल्या सर्व व्यथा-वेदना बिंदुमतीला सांगत असे. मात्र माधवीला दानात अर्पण

करायचे या महाराजांच्या निर्णयानं बिंदुमती मात्र अस्वस्थ होते. माधवीचे प्रयाण थांबवा असे महाराजांना सांगते. मात्र त्याचा काही उपयोग होत नाही. ज्या मुलीला आपण मुलीसारखे सांभाळले तिला असे परपुरूषाबरोबर पाठविताना तिला फार दु:ख होते. प्रतिष्ठान सोडून माधवी जाते त्यावेळी तिला भेटायला बिंदुमती कालंजर तिर्थावर जाते. ती माधवीला म्हणते, ''एवढी वाढवली तुला ती काय एकटे टाकून द्यायला. मी माघारी जाणार नाही. प्रतिष्ठानात मी बांधील नाही कोणाला. काय करतील महाराज माझे? ठार मारतील? सुळावर चढवतील? चढवू देत. मी तुझ्याबरोबर यायचे ठरविले आहे. तू नको म्हणालीस तर एकटीच इथे राहणार आहे मी.''[१४] मात्र माधवी तिला परत जायला सांगते. माधवीची होणारी परवड बिंदुमतीला सहन होत नाही. तिच्या मनाला खूप वेदना होतात. बिंदुमतीचे माधवीवर नितांत प्रेम आहे परंतु ययाती महाराजांच्या व माधवीच्या निर्णयापुढे ती हतबल झालेली दिसते. माधवीसाठी तिची होणारी तळमळ आपले मन हेलावून सोडते.

**दृषद्वती :-**

अयोध्यानरेश हर्यश्व महाराजांची पत्नी दृषद्वती होय. एका सम्राटाची पट्टराणी असल्यामुळे वैभव तिच्या पायाशी लोळण घेत होते. मात्र तिला पुत्र प्राप्ती होत नसल्यामुळे एवढे वैभव असून ती दु:खीच होती. पुत्र मिळावा या आशेने ती आपल्या पतीला परस्त्रीकडे म्हणजे माधवीकडे हसतमुखाने पाठविते. हर्यश्व महाराज माधवीकडे जात असताना ती त्यांची कुंकुमतिलक लावून आरती करते. ती महाराजांना म्हणते, ''पुत्राला पाहण्यासाठी उत्सुक आहे मी. जन्मदात्री माधवी असली तरी त्याला मोठे मीच करणार आहे. लवकर या ! युवराजांना घेऊन या.''[१५] यावरून तिच्या मनाचा मोठेपणा आपल्याला कळतो. परस्त्रीकडे पाठवत असताना तिला दु:ख झालेच असेल मात्र पुत्र हव्यासापोटी स्त्री कोणताही त्याग करू शकते हे येथे आपल्या लक्षात येते. दृषद्वतीच्या मनाची अवस्था तिची वेदना लेखिकेने समर्थपणे चित्रीत केली आहे.

**शुन:शेपाची माता :-**

'अश्वदा' या कादंबरीत अयोध्येतील एका यज्ञाचा प्रसंग मांडला आहे. अयोध्येचे राजा हरिश्चंद्र आजारी होते. त्यांना बरे वाटावे म्हणून वसिष्ठ एक यज्ञ करायचा ठरवितात. या यज्ञात नरबळी देण्यात येणार होता. त्यासाठी एका ब्राह्मणपुत्राला विकत आणले होते. शुन:शेपाची आई आपल्या पतीचे पाय धरून आक्रोश करत होती. तिच्या दु:खाचे निवारण करण्याऐवजी तो तिला लाथाडत होता. ब्राह्मण तिला ढकलून देऊन निघून जातो. तिच्या डोक्याला मार लागतो. त्यावेळी विश्वरथ तेथे येतो. तिला म्हणतो, "बाई, तुझ्या अश्रूंची किंमत कळली असती तर तो असा लाथाडून गेला नसता. कोण आहेस तू? काय हवे आहे तुला? का रडतेस?"[१६] ती ब्राह्मण स्त्री विश्वरथाला म्हणते, "उद्या माझ्या लाडक्याला यज्ञात आहुती देणार आहेत. माझ्या यजमानांनी त्याला हरिश्चंद्र महाराजांस विकले आहे. माझ्या शुन:शेपाला वाचवा. मला संपत्ती नको. धन समृध्दी नको. मला पुत्र हवाय."[१७] आपल्या पुत्रासाठी स्त्री किती विवश आहे हे येथे लक्षात येते. तिचा पती पैशासाठी तिच्या काळजाचा तुकडा मरणाच्या दारात देऊन येतो. तिच्या जीवनातली ही केवढी मोठी शोकांतिका आहे. ज्या पुरूषाबरोबर तिने सात जन्म काढण्याची शपथ घेतलेली असते. दोघांनी एकमेकांच्या सुख दु:खात सहभागी होण्याचे ठरविलेले असते. मात्र या स्त्रीचा पतीच तिच्या दु:खाला कारणीभूत ठरलेला आहे. याहून मोठे दु:ख कोणतेच नसावे असे वाटते. मातृप्रेम किती अगाध आहे. त्याची महती गावी तितकी थोडी आहे. माता म्हणून शुन:शेपाच्या मातेचे अंत:करण आपण समजू शकतो.

**विधी :-**

माधवी काशीनरेश दिवोदास महाराजांकडे चालली होती. एक ब्राह्मण कुटुंब एका ठिकाणी मुक्कामी थांबले होते. त्या ठिकाणीच गालव मुक्काम करायचे ठरवितो. त्या ब्राह्मण स्त्रीचे नाव विधी होते. तिचा पती काशीनगरीत काम शोधण्यासाठी गेला होता.

तिला दोन मुले होती. संसार चांगला चालला होता. मात्र कामासाठी त्यांना सारखी वणवण भटकंती करावी लागत असे. संसारासाठी दोघेही कष्ट करत होते. त्याकाळात ब्राह्मणांना उच्च दर्जाचे स्थान होते. परंतु विधीला मात्र आपल्या संसारासाठी महालात दासीचे काम करावे लागत होते. आपल्या मुलांच्या सुखासाठी, संसारासाठी तिने हे दासीपण आनंदाने स्वीकारले होते. मात्र तिला फार कष्ट करावे लागत होते. स्त्री कोणत्याही ठिकाणी असली तरी तिला दु:ख हे भोगावेच लागते हे येथे दिसते.

अशाप्रकारे 'अश्वदा' या कादंबरीत अनेक स्त्रिया आलेल्या आहेत. प्रत्येक स्त्री वेगवेगळ्या अनुभवातून दु:ख भोगत असताना आपल्याला दिसते. तिची घालमेल, तिचे दु:ख, तिला आलेले अनुभव तिची प्रतारणा, वेदना रेखाटण्यात लेखिका यशस्वी झाली आहे.

**अश्वदा मधील गुरू-शिष्य संबंध :-**

''वसुदेवसुतं देवं कंसचाणूर मर्दनम

देवकी परमानंद कृष्णे वंदे जगद गुरूम''

'आपल्या भारतीय संस्कृतीत वैभवशाली गुरूपरंपरा आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात गुरू लागतो. आपल्या मनातील अज्ञान नष्ट करून अंतरंगीचा दीप जागृत ठेवणारा गुरू आपल्यातील प्रत्येकाला हवा असतो. सद्‌गुरूचे महत्व लौकीक जीवनात त्याप्रमाणे अध्यात्मातही आहे. शिष्याने श्रध्दापूर्वक साधनेने आपली पात्रता वाढविली की गुरू स्वत:च शिष्याचा शोध घेतो. योग्य शिष्यांना विद्यादान दिल्याशिवाय तो ऋणमुक्त होऊ शकत नाही. गुरू नेहमी योग्य शिष्याच्या शोधात असतो. परमार्थ ज्ञानाची प्राप्ती साक्षात्कारी गुरूकडून होते.''[१८]

''रामायण, महाभारत, गीता, भागवत या महान ग्रंथात गुरू महिमा सांगितलेला आहे. अनादिकालापासून गुरूभाव, गुरूतत्वाचा विचार पूजनीय मानला गेला आहे.

महाभारतातील असंख्य श्लोकात गुरूमहात्म्य आहे. गुरूकडून शिष्याला विद्या प्राप्त झाल्यावर शिष्यालाही गुरूपद प्राप्त होते. तो शिष्य आपले शिष्य तयार करतो. अशा पद्धतीने गुरू-शिष्य जोड्यांची महती आजही आपण ऐकत असतो."

'अश्वदा' या कादंबरीत विश्वामित्र-गालव ही गुरूशिष्य जोडी आहे. कान्यकुब्जचा सम्राट विश्वरथ. याला राजर्षी न राहता ब्रह्मर्षी होण्याचे वेड लागते. तो त्यासाठी आपले सर्व राज्य सोडून ज्ञानार्जन करण्यासाठी सर्वत्र फिरतो. भरपूर ज्ञान प्राप्त करून विश्वरथाचा विश्वामित्र होतो. आश्रम स्थापून विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याचे काम करतो. गालव हा विश्वामित्रांचा अतिशय आवडता शिष्य असतो. विश्वामित्र व माता शीलवती त्याला आपल्या पुत्राप्रमाणे मानत. त्या दोघांचेही त्याच्यावर खूप प्रेम होते. गालवाचेही आपल्या गुरूवर व गुरूमातेवर प्रेम होते, निष्ठा होती. गालव आश्रमातले काम मन लावून करत असे. आश्रमात येणाऱ्या अतिथींची नीट व्यवस्था करे. गुरूदेव नसताना देखील तो आश्रम व्यवस्थित सांभाळीत असे. त्याचबरोबर शीलवती मातेचीही तो सेवा करत असे. गुरूदेव येईपर्यंत तो मुलांकडून प्रार्थना म्हणून घेत असे. त्याच्या कामावर गुरूदेव प्रसन्न होते.

एकदा आश्रमात धर्मऋषी आले होते. धर्मऋषी आणि विश्वामित्र बराच वेळ वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करत बसले होते. चर्चेचा विषय खूप रंगला होता. त्यामुळे धर्मऋषी जाण्याची वेळ झाली तरी विश्वामित्र त्यांना जेवायचे विचारायचे विसरून जातात. धर्मऋषी निघताना विश्वामित्र जेवणाचा आग्रह करतात. अवेळ झाल्यामुळे धर्मऋषी जेवणास नकार देतात. त्यावेळी विश्वामित्रांना खूप वाईट वाटते. अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. मात्र आपण त्यांना उपवास घडविला यामुळे विश्वामित्र निराश होतात. त्यांच्या पंक्तीला जेवतील तेव्हाच भोजन करणार असे ते ठरवतात. विश्वामित्रांबरोबर शीलवतीमाताही उपवास करणार हे गालव जाणून होता. गालव विश्वामित्रांना म्हणतो, "गुरूदेव, निदान रसपान तरी करा. आपण काहीच घेतले नाहीत तर मातेचे काय?"[२०] त्यावेळी सकाळी पाणी व संध्याकाळी

गोरस घेण्याचे गुरूदेव ठरवतात. गुरूदेवांबरोबर गालवानेही ते व्रत तसेच चालू ठेवले होते. एक वर्ष उलटल्यानंतर फाल्गुनी पौर्णिमेदिवशी धर्मऋषी आले व त्यादिवशी ती तिघे उपवास सोडतात. एवढी गालवाची गुरूदेवांवर भक्ती होती.

गुरूदेव अश्वत्थाखाली जाऊन बसले की गालव पळसाची पाने घेऊन द्रोण, पत्रावळी जोडीत बसे. काम नसले तर एखादी संहिता पाठ करे. संहिता म्हणताना उच्चार चुकले तर गुरूदेव दुरूस्त करत असत. गुरूपौर्णिमेदिवशी आश्रमात मोठा कार्यक्रम होत असे. त्यादिवशी विद्याभ्यास पूर्ण झालेले विद्यार्थी घरी जात असत. गालवाचा विद्याभ्यास पूर्ण झाल्यामुळे त्यालाही आश्रम सोडून जावे लागणार होते. मात्र गालवाला आश्रम सोडावासा वाटत नव्हता. तो गुरूदेवांना म्हणतो, ''गुरूदेव, आपल्या गैरहजेरीत माझ्याकडून काही अपराध घडला असेल तर क्षमा करा. गुरूदेव, पण मला येथून जायला सांगू नका.''[२१] एवढे त्याचे आश्रमावर प्रेम होते, गुरूदेवावर प्रेम होते की त्याला आपल्या घरी जायचीसुध्दा इच्छा होत नव्हती. विश्वामित्र गालवाला म्हणतात, ''अपराध कसला वेड्या? अरे मी तुला रागाने का इथून हाकलून देतो आहे? वेड्या, अरे विश्वामित्र संप्रदायाचा तू प्रवाहक आहेस. हा प्रवाह पुढे नेण्याचे काम तुला करावयाचे आहे.''[२२] गालव आश्रम सोडून जातो. मात्र पंधरा दिवस तो आश्रमाच्या आसपास भटकत राहतो. कारण विश्वामित्रांनी त्याच्याकडून गुरूदक्षिणा घेतली नव्हती. पंधरा दिवसांनी आश्रमात विश्वामित्रांचे अश्वांवर आख्यान सुरू होते त्यावेळेस गालव तेथे येतो. त्याला पाहून गुरूदेव चिडतात व येण्याचे कारण विचारतात. गालव त्यांना म्हणतो, ''गुरूदेव गुरूदक्षिणा सांगितल्याशिवाय मी येथून हलणार नाही.''[२३] त्यावेळी गुरूदेव विश्वामित्र त्याच्यावर खूप चिडतात व आठशे अश्वमेधी अश्व घेऊन येण्यास सांगतात. गुरूदेवांनी गुरूदक्षिणा सांगितली म्हणून गालवाला खूप आनंद होतो.

गालव आश्रमातून गेल्यानंतर अनेक शिष्य आश्रमात प्रवेश घेतात. त्यातील सुदासांच्या राज्यातून आलेला सहदेव हा विश्वामित्रांचा आवडता शिष्य होता.

B... ...S..LB KHA..DEK..R LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

गालवाप्रमाणेच तोही आश्रमात सर्व काम करत असे. रंभेची झोपडी मोडल्यानंतर ती आश्रमात येते. रंभा सहदेवाला आवडत नव्हती. मात्र शीलवती मातेने दिलेले संस्कार त्यांच्या अंगी होते. तो रंभेला गोरसाचे पात्र आणून देतो. पावसामुळे आश्रमात जमीन ओलीचिंब झाली होती. तो आश्रम स्वच्छ करतो. पाला-पाचोळा , झाडांच्या फांद्या, फुले तो गोळा करतो. गुरूदेवांनी त्याला रंभेवर नजर ठेवायला सांगितली होती. ती जबाबदारी तो व्यवस्थितरीत्या पार पाडत होता. गुरूपौर्णिमेची सर्व जबाबदारी गुरूदेवांनी सहदेवावर सोपविली होती. सहदेव सर्व कामे मन लावून करत होता. सहदेव गुरूदेवांची ज्याप्रमाणे काळजी घेत होता त्यावेळेस गुरूदेवांना गालवाची आठवण येत होती.

गालव, सहदेव व विश्वामित्र यांच्यात एक प्रकारचा जिव्हाळा, प्रेम, आत्मीयता, विश्वास होता. गुरू-शिष्य संबंध परस्परांच्या विश्वासावर अवलंबून होते. गुरू व गुरूपत्नी आश्रमातील मुलांवर मात्यापित्याप्रमाणे प्रेम करीत. शिष्यांची सर्व देखभाल करत असत. मुलांवर प्रेमाची पाखर घालत. ज्ञानदानाबरोबर त्यांना सामाजिक व्यवहारांचीही ओळख करून देत. गुरूला आपला शिष्य आपल्यापेक्षा ज्ञानाने श्रेष्ठ व्हावा असे वाटत असे. प्रत्येक शिष्याला आपण गुरूचे लाडके शिष्य आहोत व त्याच्या प्रेमाला व विश्वासाला पात्र व्हावे असे वाटे.

शिष्य गुरूंना आपले सर्वस्व मानत. त्यांच्या आज्ञेत रहात. शिष्याची प्रगती हाच गुरूचा आनंद. गुरूंना प्रसन्नता लाभावी, ते आपल्या कामामुळे संतुष्ट व्हावेत म्हणून प्रत्येक शिष्य प्रयत्न करीत असे. ओंकार स्वरूपाचा सद्गुरू समर्था चरणी लीन होऊन आशीर्वाद घेण्यात शिष्य धन्यता मानत.

अशा रीतीने प्रस्तुत कादंबरीत विविध व्यक्तिरेखांव्दारे प्रसंगाव्दारे लेखिकेने जीवनदर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे.

## क) 'अश्वदा' मधील आशय, संस्कृती यांचे चित्रण

**आशय :-**

विश्वामित्रांचा शिष्य गालव विश्वामित्राकडे 'गुरूदक्षिणा घ्या' असा हट्ट धरतो. त्याच्या सेवेने गुरूदेव संतुष्ट असतात. त्यामुळे गुरूदक्षिणा नको असे सांगतात मात्र गालव आपला हट्ट कायम ठेवतो त्यावेळी गुरूदेव चिडतात व आठशे अश्वमेधी अश्व घेऊन येण्यास सांगतात. त्यावेळी गरूड गालवाला ययाती महाराजांकडे आणून सोडतो. ययाती महाराजाकडे आठशे अश्व नसतात. ते आपली कन्या माधवीला दानात अर्पण करतात. माधवीला पुत्रप्राप्तीनंतर कौमार्य तसेच राहील हे वरदान असते. तिला होणारे पुत्र चक्रवर्ती सम्राट होणार होते. माधवी दिसायला अतिशय सुंदर होती. आठशे सहस्त्र अश्वमेधी अश्व मिळविण्याची ताकद तिच्यात होती. त्यामुळे आपल्या या कन्येला याचकाला दानात देऊन एका समर्थ राजाशी अश्वांच्या बदल्यात तिचा विवाह करून द्यावा असे ते याचक गालवाला सांगतात. मात्र एकाही राजाकडे आठशे अश्वमेधी अश्व नसतात त्यामुळे तीन वेळा दोनशे दोनशे अश्वासाठी माधवीला विनिमय करावा लागतो व सहाशे अश्व गालवाला मिळतात. उरलेल्या दोनशे अश्वासाठी माधवीला गुरूदेवांना अर्पण केले जाते. गुरूदेव माधवीला परत सोडून येण्यास सांगतात. मात्र माधवीला हे मान्य नसते. तिला माधवी व विश्वामित्रांचा तिच्या पोटात वाढणारा पुत्र हवा होता. त्यांच्याकडून तिला एक अष्टक नामक पुत्र होतो. तो पुत्र विश्वामित्र स्वत:कडे ठेवून गालवाला माधवीला प्रतिष्ठानात सोडून येण्यास सांगतात.

'अश्वदा' मध्ये संध्या देशपांडे यांनी माधवीची कहाणी अतिशय सुंदर पद्धतीने रेखाटलेली आहे. कादंबरी वाचत असताना माधवीला ज्या दु:ख यातना भोगाव्या लागल्या आहेत त्याबद्दल वाचकांना त्याकाळी स्त्रियांचे समाजातील स्थान कसे होते हे लक्षात येते. तत्कालीन स्त्री आज्ञाधारक होती. तिच्यात प्रत्येक प्रसंगाला तोंड देण्याची तयारी

होती. आपल्याला भोगाव्या लागणाऱ्या दु:खाला पुरूष जबाबदार असून देखील ती त्या बद्दल कोणावरही राग काढत नाही. विश्वामित्रांमुळे तिची ही अवस्था झाली होती. तरीसुद्धा तिने त्यांच्यावर राग न काढता त्यांचा पुत्र आपल्या पोटी जन्माला यावा म्हणून हट्ट धरला होता. त्यांच्या पुत्राला जन्म देऊन ती त्यांच्या स्वाधीन करून विश्वामित्रांच्या सांगण्यावरून पुन्हा प्रतिष्ठानात जाण्यास तयार होते.

संध्या देशपांडे यांनी आपल्या कादंबरीमध्ये संस्कृतीचे दर्शन केले आहे. कादंबरी वाचकांना अंतर्मुख करून टाकते. माधवीच्या तोंडची वाक्ये हृदय हेलावून टाकतात.

**‘अश्वदा’ मधील संस्कृतीचे चित्रण :-**

‘अश्वदा’ ही पौराणिक कादंबरी आहे. या कादंबरीत माधवीच्या जीवनाच्या करूण कहानी बरोबरच त्याकाळातील संस्कृती कशी होती याचे चित्रण आपोआप आले आहे. त्याकाळात वडीलधाऱ्या माणसांचे म्हणणे, निर्णय वयाने लहान असलेल्या व्यक्ती विरोध न करता मान्य करीत होत्या. आपल्या पित्याचा ते खूप आदर करत असत. आपल्या पित्याचा निर्णय ते मान्य करत असत. ययाती महाराजांनी पुरूकडे त्याचे तारूण्य मागितले. पुरूनेही ते मान्य करून आपले तारूण्य आपल्या पित्याला दिले. त्यासाठी त्याला पुढे फार मोठे दु:ख सहन करावे लागले. माधवीच्या जीवनाचा एवढा मोठा निर्णय ययाती महाराजांनी घेतला तरी माधवीने त्याला विरोध न करता नियतीचाच निर्णय समजून आलेल्या संकटाला सामोरी जाते. प्रतिष्ठानात याचकाला रिक्त हस्ताने पाठविण्याची प्रथा नव्हती त्यामुळे अश्वांच्या बदल्यात ययातीने माधवीला दानात अर्पण केले.

पुराणकाळात वेगवेगळ्या कारणासाठी यज्ञ केले जात होते. डॉ. उदय कुमठेकर म्हणतात, ‘‘वैदिक धर्मपरंपरा यज्ञप्रधान आहे. वेद हे या परंपरेचे आधारभूत ग्रंथ आहेत. किंबहुना वेदांची एकूण रचना व विभागणीही यज्ञ कर्माच्या व्यवस्थापनासाठीच झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ‘यज्ञ हाच प्रथम धर्म होता. देवतांनी यज्ञानेच यज्ञात

हवन केले.' असे ऋग्वेदातील पुरूषसूक्तात म्हटले आहे. यज्ञ ही भुवनांची नाभी आहे- 'यज्ञो वै भुवनस्य नाभि' असाही उल्लेख ऋग्वेदाने केला आहे. यज्ञ हा संस्कृतीचा पिता आहे, तोच प्रजापती आहे, तोच संवत्सर आहे. यज्ञ हाच चार पुरूषार्थ, चार आश्रम व वर्णव्यवस्था यांचा आधार आहे. यज्ञ हाच स्वर्ग आणि अपवर्ग प्राप्त करून देणारा आहे.''[२४]

यज्ञामध्ये ''सर्व यज्ञांचा राजा म्हणजे अश्वमेध! होय.ऋग्वेदकाळापूर्वीपासून रूढ असलेला हा यज्ञ आहे. अश्वमेधासाठी श्यामकर्णी अश्व असावा लागतो. त्याच्या शुभ्र वर्णावर काळे ठिपके असावे लागतात. त्याला मंगल स्नान घालतात. त्याच्या चारही बाजूंना अध्वर्यु, ब्रह्मा, सारथी, ग्रामाधिपती, उद्‌गाता हे सारे उभे राहतात. ऋत्विज अश्वास स्नान घालून स्वच्छ करतो. घोड्याबरोबर एक श्वानही पाण्यात सोडले जाते. त्यास मुसळांनी मारण्यात येते नंतर अश्वास यज्ञ शाळेत नेऊन त्याचे पाणी निथळेपर्यंत अग्नीस आहुती देतात. नंतर मुंजमेखलेने अश्वास बांधले जाते आणि मग सर्व देशात संचार करण्यासाठी त्यास मोकळे सोडले जाते. त्याच्या रक्षणासाठी चारशे सहस्त्र सैनिक ठेवावे लागतात. अश्वास कोणी अडवले तर हे सैन्य त्याच्याशी युध्द करून त्याचा पराभव करते. ब्राह्मण राजस्तुतीपर अख्यान गातात. घोडा सोडल्यापासून परत येईपर्यंत अध्वर्यू हाच राजा असतो. संकल्प केल्यानंतर राजा केस काढून क्षौर करतो. नखे काढतो. मौन राहतो. अनेक पशूंचे हवन करतो. पशूंचे ग्राम्य आणि आरण्यक असे दोन वर्ग करतात. आरण्यक पशूंना संस्कार करून सोडून देतात. राणीने अश्वाच्या शरीरास आज्य माखावे अशी पध्दत असते. अश्वास माख्यासाठी नेतात तेव्हा एक घोडी त्याच्यासमोर चालवितात. वेतस वृक्षाच्या डहाळ्या पसरवून सुवर्ण, रूपे, लोकर यांची शय्या करतात.'' अशाप्रकारे अश्वमेधी यज्ञ करण्याची पद्‌धत होती.

अयोध्येचे सम्राट हरिश्चंद्र आजारी होते. त्यांचा पुत्र रोहीत जन्मला तेव्हा महाराजांनी आपला पुत्र दानात द्यायचे मान्य केले होते. मात्र पुत्र मोहामुळे ते राहून गेले होते. त्यासाठी

एक यज्ञ करून त्यात रोहितचा बळी न देता एका ब्राह्मणपुत्राचा बळी द्यायचे ठरविले होते. हा ब्राह्मणपुत्र त्याच्या वडीलांकडून एक हजार गाई देऊन विकत घेतला होता. ''या यज्ञामध्ये असंख्य तीर्थावरील जलकुंभ, अनेक प्रकारची पत्री, फुले, काष्ठे, विविध धातुंची पात्रे, अलंकार, धुर्त, नवनीत, हळद, कुंकू, मृत्तिका, भस्म, शंखपुष्पी''[२५] इ. सामग्री वापरली जाणार होती.

एखाद्या सम्राटाला पुत्रप्राप्ती होत नसेल तर पुत्रकामेष्ठी यज्ञ करत होते. त्याचबरोबर सदेह स्वर्गप्राप्ती होण्यासाठी यज्ञ केला जात असे. अशाप्रकारे पुराणकाळात विविध कारणासाठी यज्ञ केला जात असे. यज्ञाबरोबरच पूर्वी दानविधी समारंभ करत असत. एखाद्या सम्राटाकडे एखादा याचक दान मागण्यासाठी आला तर त्याला सम्राट रिक्त हस्ताने पाठवत नसे. त्याला तो मागेल ते दान मोठा समारंभ करून दिले जात असे.

प्रतिष्ठानात ययाती महाराजांकडे विश्वामित्रांचा शिष्य गालव 'आठशे अश्वमेधी अश्वांची' मागणी घेऊन येतो. मात्र ययाती महाराजांकडे 'आठशे अश्वमेधी अश्व' नसतात. त्यासाठी आपली कन्या माधवी हिला दानात अर्पण करतात. ययाती महाराज हा दानविधी उत्सवासारखा साजरा करतात. उमामहेश्वराच्या मंदिरासमोरील भव्य प्रांगणात हा दानविधी केला जातो. गालवमुनींना चांदीच्या मंचकावर बसविले जाते. महाराज त्यांची यथासांग पूजा करतात. त्यानंतर माधवीला बोलावून तिचे दान गालवमुनींना करण्यात येते. दानविधीच्यावेळी माधवीने पांढरीशुभ्र वस्त्रे परिधान केली होती. त्यामुळे ती एखाद्या योगिनीसारखी भासत होती. माधवीचे दान केल्यानंतर महाराज तिच्याबरोबर माधवीच्या आवडी-निवडी, वस्त्रे, अलंकार, धन-धान्य, दास-दासी तिच्याबरोबर पाठवणार होते. हा विधी करत असताना असंख्य ब्राह्मण, ऋषिमुनी, लहानमोठे राजे, अमात्य, असंख्य श्रोतृसमुदाय हजर होता. प्रत्यक्ष दानविधी सुरू असताना पुरोहित मंत्र म्हणत असत. माधवीचे दान करताना पुरोहितांनी म्हटलेला मंत्र

"मंत्र मध्ये, क्रिया मध्ये, विष्णू स्मरणपूर्वकम!

यत किंचित क्रियते कर्म तत कर्म सफलम कुरू!"[२६] त्यानंतर हा दानविधी पूर्ण होत असे.

ऋषीमुनींच्या आश्रमात गुरूपौर्णिमेचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात असे. यादिवशी ज्या शिष्यांचा विद्याभ्यास पूर्ण झालेला असे ते शिष्य आश्रम सोडून जात असे. जाताना आपल्या गुरूला ते गुरूदक्षिणा देत असत. ही गुरूदक्षिणा धान्य, गाई, अश्व, धन, फळे, वृक्षांच्या जाती, धनुष्ये, खनिजे या रूपात दिली जात होती. त्यादिवशी सर्व आश्रम सजवला जात असे. आश्रमाच्या प्रागंणात हा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने पार पाडला जात असे. विश्वामित्र गालवाला 'आठशे अश्वमेधी अश्व' आणण्यास सांगतात. गालव सहाशे अश्व व माधवीचे दान विश्वामित्रांना करतो. त्यावेळी हा दानविधी मोठ्या उत्साहात साजरा केला गेला होता. दानविधी करत असताना गालव विश्वामित्रांपुढे उभा राहतो व अश्वस्तुती करतो त्यावेळी

"उच्चैश्रवास्त्वमश्वानां राजा विजयकारक!

सुर्यवाह नमस्तुभ्यमूमन शान्तिप्रयच्छमे!"[२७] हा मंत्र म्हणतो त्यानंतर एक अश्व गुरूदेवांच्या हाती देत तो

"महार्णविसमुचन्न उच्चै:श्रवसपुत्रक

मयात्वं गुरूमुख्याय दत्तो, सुखी भव!"[२८] हा मंत्र म्हणतो. संध्याकाळ होईपर्यंत हा दानविधी सुरूच होता. शेवटच्या अश्वाचे दान करत असताना सूर्य अस्ताला निघाला होता. अश्वांचे दान झाल्यानंतर गुरूदेवांबरोबर तो एक्काहत्तर पावले चालतो व सूर्यदर्शन घेऊन हा दानविधी संपविला जातो.

एखादी स्त्री गर्भवती असेल तर गर्भाच्या संरक्षणासाठी देवतांची प्रार्थना करण्याची पद्धत होती. ह्या विधीला अनवलोपन विधी असे म्हणत. हा विधी करत असताना अवदान

विधीने पतीने प्रजापतीला चरूची आहुती द्यायची आणि पत्नीच्या हृदयाला स्पर्श करून गर्भाच्या संरक्षणासाठी देवतांची प्रार्थना करायची अशी पद्धत होती. मुलगी ऋतुमती झाल्यावर राणीवशात त्याचा आनंदोत्सव साजरा करण्याची पध्दत होती. त्याचबरोबर मुलगी विवाहयोग्य झाल्यावर तिचे स्वयंवर मांडले जात होते. स्वयंवरासाठी अनेक राज्यातले सम्राट येत असत. त्यापैकी जो सम्राट राज्यकन्येला आवडत असे त्याच्या गळ्यात ती वरमाला घालत असे. राजा मोठ्या थाटामाटाने आपले कन्येचे कन्यादान करत असे.

पुराणकाळात शिवलिंगाची यथासांग पूजा केली जात असे. यासाठी स्नान करून शुभ्र वस्त्रे परिधान केली जात असत. पूजेला सुरूवात करण्यापूर्वी बराच वेळ त्या शिवपिंडीपुढे ध्यानमग्न अवस्थेत बसत असत. त्या पिंडीवर लक्ष पांढऱ्याशुभ्र फुलांची आरास केली जात असे. माधवीही पुत्र जन्माच्या अगोदर शिवलिंगाची अशीच यथासांग पूजा करत असे. सकाळी उठल्यानंतर स्नान करून नदीच्या पात्रात उभे राहून हिरण्यगर्भाला अर्घ्य देण्याची पध्दत होती.अर्घ्य देताना विश्वामित्रांनी तयार केलेल्या 'ॐ भू: भूर्व: स्व: ! तत्सवितुर्वरेव्यं भर्गोदेवस्य धीमहि, धियो यो न: प्रचोदयात' हा मंत्र म्हणत असे. आश्रमात देखील या मंत्राचा उपयोग केला जात असे.

त्याकाळी झाडांना पूजणे, गोमयाचे सारवण करणे, चंद्राला भाऊ मानणे, सूर्याला बाप मानणे, रात्री पाने न तोडणे, वेली बाळंतीण झाल्याशिवाय न उपटणे, सर्पाला दूध पाजणे, गाय, बैल, सिंह, मत्स्य, वराह साऱ्यांना देव मानणे अशा काही गोष्टी मानल्या जाण्याची पध्दत होती.

तत्कालीन पुरूष पितांबर व उत्तरीय परिधान करत असत. मुली परकर व काठाच्या कुंचुकी परिधान करत असत. तत्कालीन नगरामध्ये चित्रशैली प्रसिध्द असे. उदा. काशी चित्रशैलीसाठी प्रसिध्द नगर होते. नगरात असंख्य मंदिरे, प्रतीक्षागृहाच्या भिंतीवर घोडे, हरिण, बैल यांची असंख्य चित्रे दगडात कोरलेली होती. यावरून आपणाला तेथील

समाजजीवनाचा परिचय घडतो. काशीप्रमाणे अयोध्येत असंख्य मंदिरे होती. तेथील सीतारसोई, हनुमानगढी, कनकभवन, सुग्रीव पर्वत, लक्ष्मणघाट, रामघाटपुरी, स्वर्गव्दार तसेच लक्ष्मणाचे मृत्युस्थान लक्ष्मणकुंज आणि श्रावणाचा वध झाला ते माझौरा इ. स्थळे आहे. अयोध्येत गगनचुंबी इमारती व नगराबाहेर विस्तीर्ण तटबंधी व अश्मप्रक्षेपक यंत्रे बसविली होती. यावरून त्यांच्या कामगिरीचा आलेख आपल्यासमोर उभा राहतो. स्त्रिया तानपुरे, वाद्ये, चाळ आणि झांज यांचा वापर करून पदे व संवाद पाठ करत असे आणि तोंडाची रंगरंगोठी, केशरचना करून नाटकांचे प्रयोग करत असत. तेथील लोकांना अनेक विद्या व कलांचा व्यासंग होता. त्याचबरोबर वस्त्र, धान्य, जनावरे, आयुधे, मूर्ती इ. चा बाजार भरवणे, फळे, पक्षी, वैली, औषधी वनस्पती, शेती, पशुपालन, विणकाम हे त्यांचे व्यवसाय होते.

अशाप्रकारे 'अश्वदा' या कादंबरीतून पुराणकाळातील संस्कृतीचे व तत्कालीन समाजवास्तवाचे चित्रण आपल्याला वाचावयास मिळते त्यामुळे पौराणिक काळातील विविध रूढी, परंपरा, चालीरीती यांचे दर्शन घडते. तत्कालीन सामाजिक व्यवस्थेवर प्रकाश टाकण्यात लेखिका यशस्वी झाली आहे असे म्हणावे लागेल.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# संदर्भ सूची


१) दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका,
संपा. चंद्रकुमार नलगे,
अंक तिसरा, वर्ष १८,
पृ.क्र. ५.

२) दांडेकर शं.वा. (संपा.),
महाभारतातील थोर स्त्रिया,
९७४, सदाशिव पेठ, पुणे,
आवृत्ती पहिली, १९६३,
पृ.क्र. २४.

३) देशपांडे संध्या,
अश्वदा,
मेनका प्रकाशन, पुणे,
आवृत्ती पहिली, २००६,
पृ.क्र. ३५.

४) तत्रैव, पृ.क्र. ४४.

५) तत्रैव, पृ.क्र. १९५.

६) तत्रैव, पृ.क्र. २१९.

७) तत्रैव, पृ.क्र. २३१.

८) तत्रैव, पृ.क्र. २३१.

९) तत्रैव, पृ.क्र. २५१.

१०) तत्रैव, पृ.क्र. १६३.

११) तत्रैव, पृ.क्र. १८०, १८१.

१२) तत्रैव, पृ.क्र. १८६.

१३) तत्रैव, पृ.क्र. १८६.

१४) तत्रैव, पृ.क्र. ९५.

१५) तत्रैव, पृ.क्र. १३१.

१६) तत्रैव, पृ.क्र. ७९.

१७) तत्रैव, पृ.क्र. ७९.

१८) दिपमाला दिवाळी अंक, २००८,
पृ.क्र. ९.

१९) तत्रैव, पृ.क्र. ३४.

२०) देशपांडे संध्या,
अश्वदा,
उनि, पृ.क्र. १०८.

२१) तत्रैव, पृ.क्र. ८९.

२२) तत्रैव, पृ.क्र. ९०.

२३) प्रसाद,
संपा. श्री. जोशी मनोहर य.,
मे २००९, वर्ष ६२ वे, अंक १० वा,
पृ.क्र. २२.

२४) देशपांडे संध्या,
अश्वदा, उनि, पृ.क्र. १६.

२५) तत्रैव, पृ.क्र. ८०.

२६) तत्रैव, पृ.क्र. ४०.

२७) तत्रैव, पृ.क्र. २३९.

२८) तत्रैव, पृ.क्र. २४०.